**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.38, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, NOV-DEC, 2019, VOL- 7/55*

# मूल्य शिक्षणाची मूल्य निश्चितीकरण प्रक्रिया

एस के पाटील, Ph.D.

श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ एज्युकेशन कमलापूर तालुका सांगोला जिल्हा सोलापूर

*Email : sajik.k.patil@gmail.com*

***Abstract***

मूल्य म्हणजे काय? दैनंदिन व्यवहारात नेहमीच वापरला जाणारा अर्थ म्हणजे 'किंमत' होय. उदा. अमुक एक वस्तूचे मूल्य काय आहे? किंवा कशी दिली वस्तू? अस विचारून वस्तूचे मूल्य समजते. सामान्य अर्थ - किंमत किंवा भाव असा आहे. व्यवहारातील अर्थावरून पुढे आपण विचार करतो त्यावेळी वस्तूच्या अथवा एखाद्या गोष्टीच्या दर्जाला किंवा गुणवत्तेला आधार म्हणून या वस्तूचे मूल्य ठरवले जाते असे आपल्या ध्यानात येते. उदा. बाजारात एकच प्रकारची वस्तू जरी असली तरी तिचे मूल्य मात्र अलग अलग असते. म्हणजे मूल्य ठरताना गुणवत्तेचा व दर्जाचा विचार होतो. म्हणजे मूल्याचा दुसरा अर्थ व्यक्ती वा वस्तुमधील गुणवत्ता किंवा दर्जा होय. मनुष्य आपले दैनंदिन किंवा नित्य व्यवहार कोणत्या दर्जाचे करतो त्यानुसार समाजामध्ये त्याचे मूल्य जोखले जाते व्यक्ती स्वतःचे मूल्य ठरवत असताना त्याच्यासमोर विकल्प उपलब्ध असल्यानंतर जे निवडले जाते ते खरे त्याचे मूल्य असते अन्यतः अपरिहार्य स्थितीत करावी लागणारी बाब म्हणजे मूल्य नव्हे.

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रास्ताविक**

नेहमी खरे बोलावे दिलेला शब्द पाळावा वचन मोडू नये कमजोर असणाऱ्याला मदत करा, भुकेलेल्याला अन्न द्या, या अशाच प्रकारच्या कितीतरी वचनानुसार मनुष्य आपले दैनंदिन व्यवहार नियंत्रित करतो. त्यावेळी त्या मनुष्याची समाजातील किंमत चांगली असते. तो समाजाचा मार्गदर्शक असतो, लोक त्याचे नाव आदराने घेतात यालाच मूल्य म्हणतात.

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

शब्दकोशातील अर्थ : - मूल्य हा मुळात संस्कृत शब्द जसेच्या तसे मराठीत आला आहे त्याचा अर्थ किंमत किंवा मोल असा होतो.

मूल्य या शब्दाला इंग्रजीत 'Value' हा पर्यायवाची शब्द आहे. ऑक्सफर्ड इंग्लिश शब्दकोशानुसार 'Value' हा शब्द 'Valere' या लॅटिन शब्दापासून तयार झाला. 'Valere' याचा अर्थ किमतीचा असणे असा होतो. या शब्दाचा अर्थ दर्जा किंमत लायकी पात्रता असा होतो.

यावरून समजते की चांगली गोष्ट, उपयुक्तता, गुणात्मकता, पात्रता, महत्त्व इत्यादीवरून वस्तूची व्यक्तीची किंमत ठरते. याचाच अर्थ चांगल्या गुणांचा उपयुक्ततेचा समुच्चय म्हणजे मूल्य होय.

**व्याख्या**

१. 'मूल्य म्हणजे ज्या तत्वांमुळे गुणांमुळे, व्यक्ती समाज आणि विश्व यांच्यामध्ये परस्पर सुसंवाद साधून सर्वांचा विकास होतो ती तत्वे म्हणजे मूल्य होय' - नागतोडे

२. मूल्य म्हणजे ज्याला आपण चांगले समजतो असे काहीतरी उदाहरणार्थ प्रेम दयाळूपणा साधेपणा इत्यादी

-हेनरी ज्युल्स

३. 'ज्याची आकांक्षा धरावी व पाठपुरावा करावा अशी गोष्ट म्हणजे मूल्य'

-एनसीईआरटी च्या स्कूल पुस्तके मधील

४. 'मूल्य म्हणजे योग्य गोष्टीला न्याय देणारे प्रमाणाक किंवा तत्व होय' - शेरर

५. 'सद्भावनेची जोपासना म्हणजे मूल्य होय' - कडू

६. 'व्यक्तीच्या ज्या विचारांचा गुणांचा व वर्तनाचा समाज हितासाठी उपयोग होतो तो विचारून आणि वर्तन म्हणजे मूल्य होय' -डॉ. एस के पाटील

**मूल्यांची संकल्पना-**

मूल्यांचा विकास समजून घेणे गरजेचे आहे. रानटी अवस्थेत जीवन जगताना मानवाला गरजा भागवण्यासाठी अन्न मिळवण्यासाठी एकमेकांची गरज लागत होती तो समूहाने शिकार करत होता. एकमेकांच्या सहकार्याशिवाय रानटी अवस्थेत तो स्वतःची संरक्षण सुद्धा करू शकत नव्हता. त्यामुळे एकमेकांना

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

मदत करणे, आधार देणे, सहवास देणे, गरजा भागविणे या मूळ गाभ्यातून मूल्याची सुरुवात झाली समूहात राहण्याची सुरुवात केली तरी एकमेकांना एकमेकांची गरज लागत होतीच व्यक्ती व्यक्ती आणि समूहासमूहात सहकार्य सुरू झाले अशा प्रकारे एकमेकांच्या गरजा पूर्ण करणे सहकार्य करणे हे मूल्य ठरू लागले.

लोकसंख्या वाढली, गरजा वाढल्या वस्तू विनिमयाच्या पद्धती बदलून विनिमयासाठी पैसा साधन पुढे आले. पैशाला मानवी व्यवहारात मूल्य आले, परंतु सर्व गोष्टी पैशात मोजता येत नाहीत. वस्तुरूपातील या भौतिक गरजांचीच मोजदाद या पैसारुपी विनिमय साधनात करता येते हे हळूहळू समजू लागले.

भौतिक गरजांच्या पलीकडे असलेले भावनेचे विश्व मानवाला समजू लागले तशी मूल्य संकल्पना अधिक व्याप्त होत गेली. निस्वार्थपणे आई मुला-बाळांचे संगोपन करत असते. हा निस्वार्थपणा तरुण मुलं आपल्या म्हाताऱ्या आई-वडिलांची सेवा करतात 'हा सेवाभाव' साधुसंतांनी समाज प्रबोधन केले व समाजसेवा केली. भूतदया, देशसेवा, मातृसेवा 'देशसेवा' अशा प्रकारे मूल्य या संकल्पनेची व्याप्ती वाढत गेली. मूल्य संकल्पना समृद्ध होत गेली.

स्वतःचा स्वार्थ बाजूला ठेवून दुसऱ्यासाठी काम करणे समाजासाठी कष्ट करणे अशा प्रकारे वागण्याची पद्धती म्हणजे मूल्य होय. भोगापेक्षा त्याकडे विस्तारात जाऊन त्यागमय जीवन होणे म्हणजे मूल्य होय.

**मूल्यांचे वस्तुनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ स्वरूप**

व्यक्ती किंवा वस्तूला त्याची वस्तुनिष्ठ अस्तित्व असते. वस्तू चांगली, वाईट, सुंदर, कुरूप सुगंध-दुर्गंध, योग्य-अयोग्य इत्यादी प्रकारे मूळ गुण रूपात असतात. उदाहरणार्थ आकर्षक व सुगंधित गुलाबाला व्यक्तीनिष्ठ मूल्य अलग अलग असते तरी त्याचे गुणात्मक वस्तुनिष्ठ स्वरूप आहेच हे त्याचे मूल्य आहे.

व्यक्तींच्या विचारातून अनुभवातून समाधानातून लाभातून उपयोगितेतून मूल्यांची निर्मिती झाली आहे. त्यामुळे व्यक्तीनिष्ठतेने सर्व बाबींचे मूल्य कमी-अधिक ठरत असते. उदाहरणार्थ वाल्या कोळ्याची गोष्ट तुम्हाला सर्वांना माहित आहे. या काल्पनिक कथेतून लक्षात येते की मूल्यांचे स्वरूपे कसे व्यक्तिनिष्ठ आहे. अगदीच सोपे करून सांगायचे झाल्यास एखादी बाब एखाद्या व्यक्तीस लाभदायक असते तर दुसऱ्या हानिकारक असते. दुसरे उदाहरण काशीवरून पवित्र तीर्थ म्हणून संत एकनाथांबरोबर अनेकांनी पाणी आणले इतरांनी ते

Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

तीर्थ म्हणून वापरले पण एकनाथांनी तहानेने तडफडणाऱ्या गाढवाला ते पाणी पाजले. ही आहे व्यक्तिनिष्ठता या ठिकाणी आपल्या कृतीमागे असलेला उदात्त हेतू महत्त्वाचा ठरत आहे.

**नैतिक विकासाचे स्तर -**

मूल्यांचे शिक्षण देता येत नाही तर ते माणसांमध्ये रुजत असते. अनुभूती येत असते. विशिष्ट वातावरणात मूल्य अंगी रुजत असते. उदाहरणार्थ दोन भावंडांमध्ये एकच चॉकलेट असताना लहान भावंड चॉकलेटची वाटणी मी करणार म्हणते. त्याला वाटणी करण्याचा मोठेपणा मिळाल्यामुळे चॉकलेटचे समान दोन भाग नसताना मोठा भाग स्वतःकडे न ठेवता तो दुसऱ्या भावंडाला देते पण भावंड सुद्धा त्यावेळी म्हणतात नाही तू लहान आहेस तुलाच मोठा भाग असू दे अशा प्रसंगातून मूल्य रुजले जाते. त्याचा संस्कार होतो कोहलबर्गच्या मतानुसार विविध स्तरावर ती नैतिक विकास होत असतो.

**१. नवव्या वर्षापर्यंतचा स्तर -** बालकाच्या वयाच्या नवव्या वर्षापर्यंत प्राथमिक स्तर असा विचार केला आहे. या अवस्थेत मूल्यांचा उगम त्यांच्या संपर्कातील नैतिक बाबी व घटना व त्यांची वैशिष्ट्यपूर्ण अनुभूती यातून होत असते. मुर्त स्वरूपातील अनुभवालाच या अवस्थेत महत्त्व आहे.

या अवस्थेत बालक अहम केंद्रित असते (Ego-Centric) मोठ्या माणसांकडून आलेल्या अज्ञानाचे पालन म्हणजे योग्य बाबी, योग्य वर्तन शिक्षेपासून वाचण्यासाठी अज्ञानाचे पालन करणे अशी मूल्यांची सुरुवात होते. तसेच आपली वस्तू दुसऱ्याला देणे दुसऱ्यांची आपल्याला घेणे यामधून गरजा भागवल्या जाणे यामधून मिळणारा सुखद अनुभवाला चांगले मानतात व दुःखद अनुभव आला की त्याला वाईट मानतात.

**२. नऊ ते पंधरा वर्षांपर्यंतचा स्तर -** या स्तरांमध्ये कामाबद्दल वर्तनाबद्दलच्या स्वतःच्या सुखद दुःखद चांगल्या वाईट परिणामांचे मूल्य कमी होऊ लागते. व्यक्तिगत मतांपेक्षा समूहमताचा गटाचा विचार बालक करू लागते व्यक्तिगतमतानुसार चांगले वाईट फरक न करता बालक गटाच्या परिवाराच्या मित्र समूहाच्या राष्ट्राच्या अशा अपेक्षेप्रमाणे चांगले वाईट ठरवण्याचा प्रयत्न करते.

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

या अवस्थेत बालकाचे स्वतःचे छोटे छोटे गट, परिवार, शाळा इत्यादी वरती लक्ष केंद्रित असते व त्यानुसार सर्व मान्य असे व्यवहार करत असते. उदाहरणार्थ नेहमी इतरांना प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करणे मदत करणे इत्यादी केले जातात व समूहाच्या मतांमध्ये आपले मत यांत्रिक पणे दिले जाते.

**३. पंधरा वर्षांपुढील स्तर** - या स्तरावरती व्यक्ती स्वयं निर्णय घेण्यास विचार करण्यास प्रवृत्त होते. सार्वत्रिक नियमांच्या नीतीच्या आधारेच स्वयं निर्णयाचा विकास होतो. आपला निर्णय आपले मत सामुदायिक करण्याचा प्रयत्न केला जातो मानव जातीच्या कल्याणाच्या नियमांचे पालन त्याच्याकडून केले जाते. वरील प्रमाणे मानवाच्या प्रत्येक वयोगटांमध्ये त्याचा नैतिक विकास होत असतो म्हणजेच त्याला मूल्य शिक्षण मिळत असते. म्हणून याला म्हणतात. Values are not taught, they are to be caught.

**मूल्य निश्चितीकरण प्रक्रिया कशी घडते?**

रथ, हरिमन, सायमन यांच्या मतानुसार मूल्य निश्चिती होताना पुढील सात टप्प्यातून होते. स्वतंत्रपणे निवड- व्यक्ती स्वतःच्या मूल्याची निवड करते त्याचे पालन करण्यासाठी ती अधिक प्रयत्नशील असते. उदाहरणार्थ व्यक्तिगत साधेपणा स्वच्छता खरे बोलणे वक्तशीरपणा इत्यादी मूल्यांची स्वतः निवड केली असल्यामुळे इतरांच्या समोर ढोंग किंवा दाखविण्यासाठी अशी मूल्य सांभाळली जात नाही तर ती इतरांच्या गैरहजरीत सुद्धा सांभाळली जातात.

अनेक मधून एकाची निवड व्यक्ती स्वतःची मूल्य ठरवत असताना त्याच्या समोर विकल्प उपलब्ध असल्यानंतर जे निवडले जाते ते खरे त्याचे मूल्य असते अन्यतः अपरिहार्य स्थितीत करावी लागणारी बाब म्हणजे मूल्य नव्हे. त्यासाठी त्याला विकल्प उपलब्ध असावेत. उदाहरणार्थ एक गरीब शेतकरी पैशाची गरज आहे म्हणून सावकाराकडे जातो. सावकाराला पैसे मागतो सावकार विचारतो की पैशाच्या बदली काय घाण ठेवणार? शेतकऱ्याकडे काही नसते, मग सावकार पैसे देत नाही. आता बायकोचा इलाज कसा करायचा? तिच्या आजारपणाला काय करावे, पैसा तर मिळत मिळाला नाही. अशा अवस्थेत करी घरी परतताना त्याला वाटत पैशाची बॅग सापडते. ती कोणाची आहे हे माहीत नसते. तो घरी पोहोचतो आता बायकोचा इलाज करण्यासाठी

Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

देवानेच आपली मदत केली आहे अशा विचारात तो दंग असतो. त्याचवेळी गावात सर्वत्र बातमी पसरते की काका पाटलाच्या पैशाची बॅग कुठेतरी हरवली आहे. ती बातमी त्यापर्यंत पोहोचते.

या प्रसंगातील शेतकऱ्यासमोर निवडीसाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत त्याला पैशाची बॅग सापडले हे कुणाला ठाऊक नाही, त्यामुळे ते पैसे स्वतःकडे ठेवू शकतो. तसेच पैशांची गरज आहे बायकोवर उपचार करायचे आहेत. सावकारी पैसे देत नाही. सापडलेले पैसे आपलेच नाहीत तसेच ते कोणाचे आहेत हेही त्याला समजले आहे. पैशातून उपचार करावेत पैसे तसेच ठेवावेत तसे परत करावेत पैशाची मदत देवानेच आपणाला केली आहे असे समजावे असे अनेक पर्याय शेतकऱ्यासमोर असतात. त्यातील तो पैसे परत करण्याचा पर्याय निवडतो. ते त्या शेतकऱ्यांच्या अंगी असलेल्या प्रामाणिकपणा हे मूल्य आहे.

अनेक पर्याय मधून एक पर्याय निवडताना प्रत्येक पर्याय निवडीचा परिणाम पाहणे किंवा त्यावर विचार करणे करून निवड करणे-

कोणता पर्याय निवडीमुळे कोणता परिणाम होईल याचा सारासार विचार करून निवड केल्यानंतर योग्य मूल्याची निवड होत असते. उदाहरणार्थ मागील उदाहरणातील शेतकरी विचार करतो हे पैसे आपल्याला आपल्या गरजेला देवानेच दिले आहेत, त्यामुळे पैसे सापडले त्यावेळी आपण आपणास कोणीही पाहिले नाही, परंतु आपले मन आयुष्यभर आपल्याला सतावत राहील की तू दुसऱ्याच्या पैशांनी बायकोचा इलाज केलास तू पापी आहेस, म्हणजे स्वतःचे मन स्वतःला माफ करणार नाही. दुसरा भाग आपणास पैसे सापडले होते. कुणाकडून समजले तर आपली गावात काय प्रतिष्ठा राहील का? आपण गुन्हेगार सिद्ध होऊ. तिसरा भाग आपण काका पाटलांचे पैसे परत केले तर पाटील खुश होईल प्रामाणिकपणाबद्दल मोठे बक्षीस देईल किंवा बायको आजारी आहे समाजात संपूर्ण उपचाराचे पैसे पाटील बक्षीस म्हणून देईल. चौथा भाग समजा पाटलाने असा विचार केलाच नाही, बक्षीस दिलेच नाही तर? काय समद्या गावात माझी प्रतिष्ठा वाढेल. समदा गाव म्हणजे सदासारखा प्रामाणिक माणूस या या दुनियेत हाय म्हणून दुनिया अजून टिकून हाय. बस्स अजून काय हवं मला.

Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**१. निश्चयाने स्वीकारणे -** आपण जी गोष्ट करतो निवडतो ती बऱ्याच वेळेला इतरांना बघून, त्यांना काय वाटेल बघून करत असतो. परंतु मूल्य म्हणजे अशी गोष्ट आहे की ती आपल्या निश्चयपूर्वक केलेली असली पाहिजे. उदाहरणात शेतकऱ्याने सापडलेले पैसे परत दिले त्यावेळेस काका पाटलांनी बक्षीस दिलेच नाही नुसते शाब्दिकच आभार मानले त्यावेळेस शेतकऱ्यांनी शेतकऱ्याची इतर मित्र त्याला सांगू लागले अरे काका पाटील काय माणूस आहे आणि तू त्या प्रामाणिक त्याला प्रामाणिकपणा दाखवायला गेला होतास होय? म्हणजे बक्षिसापेक्षा त्याची रक्कम तो हडप करायला हवी होतीस अशा प्रसंगी सुद्धा शेतकरी स्थितप्रद्न्य होता व म्हणाला मला जे जी गोष्ट योग्य वाटली तीच मी केली आहे माझा तो निश्चय आहे निर्धार आहे मला प्रामाणिकच राहायचे आहे हे मूल्य असते.

**२. मूल्यनिवडीप्रमाणे कृती -** मूल्याचा जीवनावर परिणाम होत असतो दैनंदिन व्यवहारात मूल्य दुर्लक्षित होत असतात आपणास. महत्व वाटणाऱ्या मूल्यासाठी त्याच्या जपूनुकीसाठी आपण काही वेळ श्रम, पैसा सुद्धा खर्च करावा लागतो. त्यामुळे आपल्या समविचारी सममूल्य असणाऱ्या समुदायात आपणास आपलेपणा वाटतो. आपण त्यांच्याशी जवळीक साधतो म्हणजेच समविचारी लोक एकत्र येतो. समान व्यवहारातील, समान वेशातील लोक एकत्र येतात हा सर्वांमध्ये एकत्र आणणारा जो धागा आहे ते त्या समूहाचे मूल्य आहे

**३. मूल्याची पुनरावृत्ती -** ज्यावेळी मूल्याची निवड होते निश्चयाने स्वीकारले जाते त्यावेळी ते मूल्य आपल्या व्यवहारात सर्वत्र येते. त्याची पुनरावृत्ती होते पुन्हा पुन्हा घडणाऱ्या गोष्टीतून आनंद प्रतिष्ठा निर्माण होते. उदाहरणार्थ सहकार्यवृत्ती परोपकारीवृत्ती इतरांना समजून घेण्याचे वृत्ती या प्रकारची मूल्ये व्यक्तित असतील तर ती पुन्हा पुन्हा जीवनात दिसतात. मदत मागण्यासाठी गेला म्हणूनच मदत केली असे होत नाही तर समोरचा गरजू ही प्रत्येक वेळी मदत करणारा साठी संधी असते. म्हणजेच मूल्यांची जीवनात पुनरावृत्ती होत असते.

समारोप - अशा प्रकारे मूल्याची निवड ही सर्व पर्याय व त्यांच्या परिणामांचा विचार करून होत असते. याला त्याला मूल्य असे म्हणतात. आपल्याला अनेक पर्याय उपलब्ध असले तरी आपण त्यांचं महत्त्व जाणून घेतले पाहिजे. त्यामधून आपणाला समान समाधान लाभणार आहे, चेन पडणार आहे, सुख वाटणार आहे, अभिमान वाटणार आहे, प्रतिष्ठा वाटणार आहे इतरांचे हीच साधणार आहे. इतरांना मदत होणार आहे. दुसऱ्यांची कल्याण

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

होणार आहे आपला निस्वार्थ भाव दिसणार आहे, इत्यादी भावभावना तयार होणार आहेत अशा बाजूला जीवनात महत्त्व देणे म्हणजे मूल्य होय.

**संदर्भसूची**

**हिंदी –**

प्रो. रामशकल पाण्डेय प्रा. करुणाशंकर मिश्र (२००५-०६), तृतीय संस्करण, आग्रा विनोद पुस्तक मंदिर

**मराठी –**

डॉक्टर मुळावकर संतोष मोतीराम, डॉ. मुळावकर कल्पना संतोष, *(२००५)*, मूल्यशिक्षण*:* सुसंवाद नागपूर विद्या प्रकाशन

डॉक्टर नागतोडे किरण *(२००६)*, नैतिकमूल्य शिक्षण, नागपूर, विद्या प्रकाशन

डॉक्टर गावंडे एकनाथ, प्राध्यापक गावंडे अमित मूल्याधिष्ठित शिक्षण पुणे*:* नित्यनूतन प्रकाशन

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*